पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: Purchaseu2019@sus.ac.in, fao@sus.ac.in
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

जा.क्र.पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२५/325 दिनांक: 15 SEP 2025

प्रति

-------------------------

-------------------------

**विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या ऑक्टोंबर/नोव्हेंबर-२०२५ मध्ये होणाऱ्या परीक्षेच्या एका सत्राच्या कालावधीसाठी सोलापूर शहर व ग्रामीण भागातील सर्व परीक्षा केंद्रावर नियंत्रण ठेवण्याकरिता गठीत केलेल्या भरारी पथकासाठी व इतर विद्यापीठाच्या कामासाठी गरजेनुसार अंदाजे ०४ वाहने (AC & Non-AC) (कमी/जास्त) भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उपरोक्त नमूद विषयाप्रमाणे **Swift, D-zire, Indica, Creata, i-20, Brezza & Verna** (AC & Non-AC) ही वाहने भाडेतत्वावर पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपले अपेक्षित दर GST सह सोबत जोडलेल्या ***अंदाजपत्रकामधील [SCHEDULE – B]*** तपशीलाप्रमाणे दर दरपत्रकात भरुन मा.वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे. वरील कामाचे दरपत्रक व सुचना पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाच्या ***http://sus.ac.in*** या संकेतस्थळावर (***Quotation***) या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

| अ.क्रं | तपशिल | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | दरपत्रके प्रकाशित करण्याचा दिनांक व वेळ | १५/०९/२०२५ | | वित्त व लेखा विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर- ४१३ २५५ |
| २. | दरपत्रके स्विकारण्याची दिनांक व वेळ | १५/०९/२०२५ | | |
| ३. | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | २२/०९/२०२५ | सांय. ०६.०० | |
| ४. | दरपत्रक उघडण्याचा दिनांक/वेळ आणि ठिकाण (शक्य झाल्यास) | २३/०९/२०२५ | दु. ०३.०० | |

MSKhar

(सीए. एम.एस. खराडे)
**वित्त व लेखा अधिकारी**

## सुचना व अटी

१. कंपनी/फर्मचे शॉप ॲक्ट, पॅन कार्ड GST Registration ग्राहक सुची, दरपत्रकातील सुचना व अटी स्वाक्षरीत करुन इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. तसेच सोबत जोडलेल्या SCHEDULE-B मध्ये नमुद केल्याप्रमाणे सादर करावेत. GST (%) चा दर स्वतंत्रपणे नमूद करावा. AC & NON-AC चे दर वेगवेगळे देण्यात यावेत.

२. भरारी पथक यांच्या आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाच्या आदेशानुसार पुरवठा करण्यात येणाऱ्या वाहन संख्येमध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे वेळोवेळी कळविण्यात येईल, व त्यानुसार वाहनांचा पुरवठा करावयाचा आहे.

३. वाहन पुरवठा करावयाच्या वाहनाचा विमा (Full Insurance) असणे आवश्यक आहे. याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी पुरवठादार यांच्यावर राहील. पुरवठा करण्यात येणाऱ्या वाहनांची वैध नोंदणी, वाहनाचा विमा, पीयुसी असणे आवश्यक आहे. या संदर्भात RTO कडून काही दंड झाल्यास याबाबत विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही.

४. पुरवठा केलेले वाहन/वाहने वापर केलेल्या व्यक्तीकडून वाहन वापर अहवालावर स्वाक्षरी घ्यावी. तसेच दैनंदिन कि.मी. ची नोंद स्वतंत्रपणे ठेवून वाहन स्वाक्षरीत वापर अहवाल व कि.मी. नोंदवही देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील. प्रत्यक्षात वाहनांचा वापर झाल्याप्रमाणेच देयके आदा करण्यात येईल.

५. दरपत्रकासोबत असलेले सुचना व अटींचे काटेकोरपणे पालन करणे बंधकारक राहील.

६. Toll च्या देयकांच्या व त्याचे स्टेटमेंट पावत्याप्रमाणे रक्कम आदा करण्यात येतील. या व्यतिरीक्त इतर कोणतेही चार्जेस आदा करण्यात येणार नाहीत. पुरवठा केलेले वाहनास हॉल्ट करावे लागल्यास त्याबाबतचे चार्जेस दरपत्रकात नमूद केल्याप्रमाणे आदा करण्यात येईल.

७. आपण पुरवठा करणाऱ्या वाहनाचा चालक उच्च प्रशिक्षित, परवानाधारक, निर्व्यसनी, सुशिक्षित, नम्र असणे बंधकारक आहे. तसेच पुरवठा वाहनाच्या वाहनचालकासोबत कंपनी/फर्मचे ओळखपत्र, इ. असणे आवश्यक आहे.

८. ज्या दरपत्रक/ ई-निविदाधारकांची दरपत्रक मंजुर होईल त्यास सुरक्षा ठेवीची रक्कम दरपत्रक अंदाजे किमंतीच्या ०३ टक्के (रु. १८,०००/-) इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन वित्त व लेखा विभागाकडे रोख स्वरुपात ठेवणे बंधनकारक राहील, व काम समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर पुरवठादाराच्या मागणीनंतर बिन व्याजी परत करण्यात येईल.

९. **पाकीटावरती भरारी पथकांकरिता अंदाजे ०४ वाहने भाडेतत्वावर पुरवठा करण्याकरिता दरपत्रके असा स्पष्ट उल्लेख करावा.**

१०. दरपत्रके देताना आपले दर सर्व करासहित (Including GST) असा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच ज्या पुरवठादाराची वार्षिक उलाढाल जास्त नसेल त्यांनी GST लागू नसल्याचे फर्मच्या लेटर हेडवर लेखी स्वरुपात द्यावे लागेल. तसेच सदर वाहने परीक्षा विभागाच्या आवश्यकतेनुसार व मागणीनुसार विद्यापीठात पाठविण्यात यावीत.

११. दरपत्रकधारकांनी वाहनाचा पुरवठा करण्याचे नाकारल्यास सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त करण्यात येईल. व खुल्या बाजारातून वाहन भाडयाने घेण्यात येईल आणि त्यापोटी होणारे नुकसान भरपाई सुरक्षा ठेवीमधुन वसुल करण्यात येईल.

१२. देयकामधुन आवश्यक करांची कपात करून देयक आदा करण्यात येईल.

१३. सादर केलेल्या दरपत्रकाच्या दरामध्ये खाडाखोड किंवा व्हाईटनरचा वापर केला गेला असल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

१४. सादर केलेल्या दरपत्रकामध्ये दरपत्रकधारकांनी अटी व शर्ती नमूद करुन दर दिले असल्यास दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

१५. देयकाबाबत/दरकरारातील सुचना व अटीबाबत वाद निर्माण झाल्यास याबाबत निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार मा.कुलगुरु यांना राहतील.

१६. यशस्वी पुरवठाधारकासोबत कायदेशीर कलह निर्माण झाल्यास सोलापूर येथील न्यायकक्षेच्या अखत्यारित राहील.

१७. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे किंवा कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया रद्द करण्याबाबत विद्यापीठाने अधिकार राखून ठेवलेले आहेत. तसेच पुरवठा आदेशानुसार वाहने उपलब्ध न झाल्यास पुरवठादाराचा ठेका रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

१८. वरील दरपत्रकासंदर्भात काही शंका/अडचण असल्यास विद्यापीठाच्या ०२१७-२७४४७७१-७३ (Ext.१७३) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१९. दरपत्रक हे सिलबंद पाकिटातून कार्यालयीन वेळेत मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३ २५५ यांच्या नावाने विहित मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती असलेली दरपत्रके मंजूर करण्यात येणार नाहीत.

२०. **वरील सुचना व अटी मान्य असून ते माझ्यावर बंधनकारक राहतील.**

**पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का**

**प्रति,** **दि.**

मा. वित्त व लेखा अधिकारी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

**विषय:** **प्रस्तुत विद्यापीठाच्या ऑक्टोंबर/नोव्हेंबर-२०२५ मध्ये होणाऱ्या परीक्षेच्या एका सत्राच्या कालावधीसाठी सोलापूर शहर व ग्रामीण भागातील सर्व परीक्षा केंद्रावर नियंत्रण ठेवण्याकरिता गठीत केलेल्या भरारी पथकासाठी व इतर विद्यापीठाच्या कामासाठी गरजेनुसार अंदाजे ०४ वाहने (AC & Non-AC) (कमी/जास्त) भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत...**

**महोदय,**

वरील विषयाकिंत वाहने आम्ही खालील नमूद दराप्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहोत.

***अंदाजपत्रक [SCHEDULE – B]***

***{दरपत्रक हे फर्मच्या लेटर हेडवर द्यावे}***

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | ८ तास/८० कि.मी. करिता दर (रु.) | १२ तास/२०० कि.मी. करिता दर (रु.) | २४ तास/३०० कि.मी. करिता दर (रु.) | ३०० कि.मी. पेक्षा जास्त कि.मी. झाल्यास प्रति कि.मी. दर (रु.) | ८०/२००/३०० कि.मी. च्या पुढील प्रत्येकी कि.मी. करिता दर (रु.) | ८/१२/२४ तासाच्या पुढी प्रत्येकी तासाकरिता दर (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Swift (AC) | | | | | | |
| 2. | D-zire (AC) | | | | | | |
| 3. | Indica (AC) | | | | | | |
| 4. | Creta (AC) | | | | | | |
| 5. | i 20 (AC) | | | | | | |
| 6. | Brezza (AC) | | | | | | |
| 7 | Verna (AC) | | | | | | |
| | GST दर फक्त % मध्ये नोंद करावी | -----% | -----% | -----% | -----% | -----% | -----% |
| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | ८ तास/८० कि.मी. करिता दर (रु.) | १२ तास/२०० कि.मी. करिता दर (रु.) | २४ तास/३०० कि.मी. करिता दर (रु.) | ३०० कि.मी. पेक्षा जास्त कि.मी. झाल्यास प्रति कि.मी. दर (रु.) | ८०/२००/३०० कि.मी. च्या पुढील प्रत्येकी कि.मी. करिता दर (रु.) | ८/१२/२४ तासाच्या पुढी प्रत्येकी तासाकरिता दर (रु.) |
| 1. | Swift (Non-AC) | | | | | | |
| 2. | D-zire (Non-AC) | | | | | | |
| 3. | Indica (Non-AC) | | | | | | |
| 4. | Creta (Non-AC) | | | | | | |
| 5. | i 20 (Non-AC) | | | | | | |
| 6. | Brezza (Non-AC) | | | | | | |
| 7. | Verna (Non-AC) | | | | | | |
| | GST दर फक्त % मध्ये नोंद करावी | -----% | -----% | -----% | -----% | -----% | -----% |

**(वरील सर्व वाहनांकरिता मुक्कम भत्ता (Hault Charges) --------------------------)**

(GST **दर फक्त % मध्ये नोंद करावी. उदा. १२% किंवा १८%**)

उपरोक्त दराप्रमाणे मी/आम्ही काम करण्यास तयार आहोत.

पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का

## DECLARATION

I, ______________________________________ hereby declare that, our firm ______________________________________ is not Black listed, debarred or prohibited by Government of India or any other Government, Union Territory, Authority or Organization or University. I further declare that, no case/s, criminal or Civil or Enquires of any kind are pending or settled between our firm and Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University before judicial and quasi-judicial authority. If any civil and criminal case is found pending against university is right to action against us.

Name of the Bidder/

Firm, Seal & Signature